# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक: २५/२/२००९

## <u>दि. २५/२/२००९ रोजी घेण्यांत आलेल्या वृक्षप्राधिकरण समिती सभेचे इतिवृत्त</u>

(३)

उल्हासनगर महानगरपालिकेच्य वृक्ष प्राधिकरणाची सभा मंगळवार दिनांक १७/२/२००९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करुन बुधवार, दिनांक २५/२/२००९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील मा. आयुक्तांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य उपस्थित होते.

श्री. समीर उन्हाळे ––आयुक्त

| | |
|---|---|
| १. श्री. विनोद ठाकूर | सदस्य |
| २. श्री. लाल पंजाबी | –''– |
| ३. श्री. राजू इदनानी | –''– |
| ४. श्री. अंकुश म्हस्के | –''– |
| ५. श्रीम. मोना वनवारी | –''– |
| ६. श्री. बी.बी. मोरे | –''– |
| ७. श्री. राजू जग्यासी | –''– |

**खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थितीत होते.**

१. श्री. राजेश वानखेडे, २. श्रीम. मीना सोनेजी (सोंडे), ३. श्री. दिलीप गायकवाड, ४. श्रीम. ज्योती माने, ५. श्री. जमनु पुरस्वानी, ६. श्रीम. रजनी महाडीक, ७. श्रीम. सुरेखा वेलकर, ८. श्रीम. निलू चांदवानी

**खाली दर्शविलेले अधिकारी सभेत उपस्थित होते.**

१. श्री. प्रकाश पं. कुकरेजा, महापालिका सचिव
२. श्री. आर.बी. शिर्के , प्रभारी शहर अभियंता तथा मुख्य वृक्ष अधिकारी

तसेच श्री. तानाजी पतंगराव, लिपिक हे सभेस उपस्थित होते.

सायंकाळी ४.४५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:–</u> विषय क्रमांक. १ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र १ :–</u> मागील सभेचे दिनांक ११/८/२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

<u>काही सदस्य :–</u>पास पास........

<u>श्री. समीर उन्हाळे , मा. आयुक्त तथा सभापती</u> :– सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.. 

---

☑

**विषय क्र. १** :– मागील सभेच दिनांक १/८/२००८रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नांव : श्री.बी.बी. मोरे

स्थायी समिती ठराव क्र. :— ६८ अ दिनांक : २५/२/२००९

हे वृक्षप्राधिकरण महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक ११/८/२००८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १२ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

एकमताने

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:— विषय क्रमांक. २ वाचुन दाखवितात.

विषय क्र २ :— प्लॉट न. 410 व 411 जवळ, लालचक्की, उल्हासनगर-4 येथिल **आंब्याचे झाडाच्या फांदया** तोडणेस परवानगी देणे

काही सदस्य :—पास पास........

श्री. समीर उन्हाळे , मा. आयुक्त तथा सभापती :— सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र २ :— प्लॉट न. 410 व 411 जवळ, लालचक्की, उल्हासनगर-4 येथिल **आंब्याचे झाडाच्या फांदया** तोडणेस परवानगी देणे

प्रस्तावना

उपरोक्त विषयाबाबत श्री. नारायण शंभू खरटमल यांनी त्यांच्या दिनांक १) २३/१/२००६ व २) २५/६/२००८ च्या पत्रानुसार प्लॉट न. 410 व 411 जवळ, लालचक्की, उल्हासनगर-4 या ठिकाणी असलेल्या आंब्याच्या झाडाच्या फांदया छाटण्या करीता परवानगी मागितलेली आहे. उक्त झाडाच्या फांदया खालील कारणामुळे छाटणे आवश्यक आहेत.

१. आंब्याच्या झाडाच्या बांदया एका बाजूने अर्जदाराच्या घराच्या छपरावर झुकले आहे. झाडाच्या फांदया घरावर पडून जिवित हानी व वित्तहानी होवू शकते. झाडाच्या फांदया छापटल्यास धोका धोका उद्‌भवु शकणार नाही.
२. सदरचे झाडाच्या फांदया झुकल्या आहेत. पावसामुळे झाडाच्या फांदया केव्हाही तुटून पडुन हानी होण्याची शक्यता आहे.

सदर झाडाच्या फांदया तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाडाच्या फांदया छाटणे करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

<u>वृक्षप्राधिकरण ठराव क्र :–</u> ६९ <u>दिनांक:–२५/२/२००९</u>

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. विनोद ठाकुर

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. नारायण शंभू खरटमल यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून प्लॉट न. 410 व 411 जवळ, लालचक्की, उल्हासनगर-4 या ठिकाणी असलेल्या आंब्याच्या झाडाच्या फांदया तोडण्यास परवानगी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:–</u> विषय क्रमांक. ३ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र ३ :–</u> सी-ब्लॉक 78/293 , उल्हासनगर-3 येथिल **उंबराचे व जंगली झाड तोडणेस** परवानगी देणे.

<u>काही सदस्य :–</u>पास पास........

<u>श्री. समीर उन्हाळे , मा. आयुक्त तथा सभापती</u> :– सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे .

---

☑ <u>विषय क्र. ३ :–</u> सी-ब्लॉक 78/293 , उल्हासनगर-3 येथिल **उंबराचे व जंगली झाड तोडणेस** परवानगी देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाबाबत श्री. दिनेश राजकुमार हासानी यांनी त्यांच्या दिनांक २८/५/२००८ च्या पत्रानुसार सी-ब्लॉक 78/293 , उल्हासनगर-3 येथिल या ठिकाणी असलेल्या उंबराचे व जंगली झाडे तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. उक्त झाड सद्यस्थितीमध्ये धोकादायक वाटत नसेल तरी त्याच्या पायथ्याशी असलेली मुळे आजुबाजुच्या घरांच्या खाली गेल्याने घराच्या भिंतीला व पायाला धोका निर्माण झालेला दिसत आहे, त्यासाठी झाड तोडणे आवश्यक आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट ग्स्ट १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :– ७० दिनांक:– २५/२/२००९

सुचकाचे नाव :– श्री.बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती मोना वनवारी

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. दिनेश राजकुमार हासानी यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून सी-ब्लॉक 78/293 , उल्हासनगर-3 येथिल उंबराचे व जंगली झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीचे प्रत्येकी एक–एक नविन झाड ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:– विषय क्रमांक. ४ वाचुन दाखवितात.

विषय क्र ४ :– **बाबासाई नगर, बाबासाई स्कुल, उल्हासनगर-4 येथिल जांभुळ, आंबा व बदामाचे झाड तोडणेस परवानगी देणे.**

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–कोणती झाडे आहेत?

महापालिका सचिव :–जांभुळ, आंबा व बदाम.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–ही तर फळे देणारी झाडे आहेत.

महापालिका सचिव :–या झाडांच्या फांदया तोडायच्या आहेत आणि पिंपळाचे झाड ताडायचे आहे. सभा सूचनेवर विषय चुकीचा आला आहे परंतु आम्ही जो ठराव तयार केला आहे तो जांभुळ, आंबा व बदाम या झाडांच्या फांदया तोडण्याकरीता व पिंपळाचे झाड तोडण्याकरीता परवानगी देणे असा आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :–तीन झाडांच्या फांदया तोडायच्या आहेत आणि एक झाड तोडायचे आहे?

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–कधी कधी असे होते की, एखादयाला वाटते की, याठिकाणी असलेले झाड बरोबर वाटत नाही ते तोडले पाहिजे मग त्याबाबत अर्ज वगैरे करुन झाड तोडण्याचा प्रस्ताव प्रधीकरणाकडे येत असतो.

महापालिका सचिव :–एक झाड तोडले तर त्याजागी एक नविन झाड लावावे लागते. तसेच झाड तोडण्यास परवानगी देण्याचे प्रस्तावित करण्या अगोदर सदर झाड तोडण्यास कुणाची काही हरकत तर नाही ना? अशा आशयाची जाहीा सूचना स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करावी लागते आणि त्या सूचनेचा कालावधी पुर्ण

झाल्यानंतर जर एकही हरकत प्राप्त झाली नाही तर झाड तोडण्यासाठी परवानगी मिळणेकामी प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविला जातो. वृक्षप्राधिकरणाने परवानगी दिल्यानंरतच झाड तोडले जाते व त्या जागी एक नविन झाड लावावे लागते. त्यासाठी अर्जदाराकडून अनामत रक्कम घेतली जाते.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>या अगोदर झाडे तोडण्यासाठी जेवढया परवानग्या दिल्या आहेत त्यानुसार त्या ठिकाणची झाडे तोडल्या नंतर तेथे नविन झाडे लावण्यात आली आहेत किंवा नाहीत? त्याची कुणी पाहणी केली आहे काय?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>याबाबतचा प्रस्ताव पुढील महासभेत आणला जावा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>उदयान अधिक्षकाची आतापर्यंत आपल्याकडे नियुक्ती करण्यात आलेली नाही.मग ही झाडे लावलीत किंवा नाहीत हे कोण पाहणार?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:— </u>शांतीनगर, येथील आरक्षण क्र.२९ हा भुखंड उद्यानाकरिता आरक्षित आहे, या जागेवर उद्यान विकसित करण्यात यावे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>जेथे झाडे तोडण्यात आली आहेत तेथे नविन झाडे लावली की नाहीत त्याची पाहणी केली पाहिजे आणि त्याबाबतचा अहवाल सभेपुढें आला पाहिजे.

<u>महापालिका सचिव :—</u>याप्रकारचा अहवाल या प्राधिकरणापुढे येणार नाही तर तो सहा महिन्यानंतर महासभेपुढे आला पाहिजे अशी कायदयात तरतुद आहे.

<u>श्री. समीर उन्हाळे , मा. आयुक्त तथा सभापती</u> :— आजपर्यंत किती झाडे तोडण्यास परवानग्या देण्यांत आल्या जी झाडे तोडण्यास परवानग्या देण्यात आल्या आहेत ती झाडे तोडल्यानंतर तेथे नविन झाडे लावण्यात आली आहेत की नाहीत, किती झाडे लावण्याचे अदयाप बाकी आहेत. झाडे लावली नसतील तर त्यांचेवर काय कारवाई करण्यांत आली? लावलेल्या झाडांमधील किती झाडे सध्या जिवंत आहेत? याबाबतचा अहवाल वृक्ष अधिकारी तथा प्रभाग अधिकारी यांनी मुख्य वृक्ष अधिकारी तथा शहर अभियंता यांचे मार्फत पुढील महासभेत प्रस्तृत करावा.तसेच मुंबई येथिल वृक्ष प्राधिकरणास भेट देण्यासाठी वेळ ठरवुन घेतली जावी, व आरक्षण क्र.२९ उद्यानाकरिता आरक्षित आहे, त्या जागेवर उद्यान विकसित करण्यासाठी शहर अभियंता यांनी प्राकलन तयार करावे.

<u>काही सदस्य :—</u>पास पास........

<u>श्री. समीर उन्हाळे , मा. आयुक्त तथा सभापती</u> :— सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव

संमत करण्यात येत आहे 

---

☑ <u>विषय क्र ४ :—</u> *बाबासाई नगर, बाबासाई स्कुल, उल्हासनगर-4 येथिल* ***जांभुळ, आंबा व बदामाचे झाडाच्या फांदया*** *तोडणेस व पिंपळाचे झाड तोडणेस परवानगी देणे.*

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाबाबत श्रीमती निलम ठाकुरदास चांदवानी (नगरसेविका) यांनी त्यांच्या दिनांक ३१/१/२००८ च्या पत्रानुसार *बाबासाई नगर, बाबासाई स्कुल, उल्हासनगर-4* या ठिकाणी असलेल्या जांभुळ, आंबा व बदामाचे झाडाच्या फांदया तोडण्यास व पिंपळाचे झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. अ) आंबा, जांभुळ, बदाम सदर झाडाच्या फांदया शाळेच्या छपरावर पसरलेले आहे. त्या

छाटल्याने भविष्यात धोका उद्भवू शकणार नाही.

ब) पिंपळाचे झाड शाळेच्या प्रवेशद्वार जवळ भिंत तोडुन झाड एका बाजूस झुकलेले आहे.

२. सदर झाड झुकले आहे. व सदर झाड मुळापासुन पडण्याची शक्यता आहे. पावसामुळे हे झाड केव्हाही तुटुन पडून हानी होण्याची शक्यता आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट ग्स्ट १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

<u>वृक्षप्राधिकरण ठराव क्र</u> :— ७१ <u>दिनांकः—</u> २५/२/२००९

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. अंकुश म्हस्के

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती निलम ठाकुरदास चांदवानी (नगरसेविका) यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका—याच्या अहवालावरून *बाबासाई नगर, बाबासाई स्कुल, उल्हासनगर*-4 या ठिकाणी असलेले जांभुळ, आंबा व बदामाचे झाडाच्या फांदया तोडण्यास व पिंपळाचे झाड तोडणेस परवानगी देत आहे. व तोडलेल्या झाडाच्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीचे एक नविन झाड ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ४.५५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे वृक्षप्राधिकरणाचे सभापती मा.आयुक्त श्री. समीर उन्हाळे यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका,</u>
## <u>उल्हासनगर</u>

दिनांक: १५/७/२००९

## <u>दि. १५/७/२००९ रोजी घेण्यांत आलेल्या वृक्षप्राधिकरण समिती</u>

# सभेचे इतिवृत्त

४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरणाची सभा, दिनांक १५/७/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील मा. आयुक्तांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य उपस्थित होते.

**आयुक्त —— श्री. अशोक बागेश्वर**

| | |
|---|---|
| ८. श्री. राजू इदनानी | सदस्य |
| २. श्री. अंकुश म्हस्के | —''— |
| ३. श्रीम. मोना वनवारी | —''— |
| ४. श्रीम. निलू चांदवानी | —''— |
| ५. श्री. लाल पंजाबी | —''— |
| ६. श्री. जमनु पुरस्वानी | —''— |
| ७. श्री. बी.बी. मोरे | —''— |
| ८. श्रीम. रजनी महाडीक | —''— |

**व खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थितीत होते.**

| | |
|---|---|
| १. श्री. विनोद ठाकूर | —''— |
| २. श्रीम. मीना सोनेजी (सोंडे) | —''— |
| ३. श्री. दिलीप गायकवाड | —''— |
| ४. श्रीम. ज्योती माने | —''— |
| ५. श्रीम. सुरेखा वेलकर | —''— |
| ६. श्री. राजू जग्यासी | —''— |
| ७. श्री. राजेश वानखेडे | —''— |

**खाली दर्शविलेले अधिकारी सभेत उपस्थित होते.**

३. श्री. प्रकाश पं. कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.
५. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

**तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.**

श्री. तानाजी पतंगराव, लिपिक

दुपारी १२.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:—** विषय क्रमांक. १ वाचुन दाखवितात.

**विषय क्र १ :—** मागील सभेचे दिनांक २५/२/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

**काही सदस्य :—**पास पास........

**श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती** :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..



☑ **विषय क्र १:–** मागील सभेचे दिनांक २५/२/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे

**वृक्षप्राधिकरण ठराव क्र :–** ७१ अ **दिनांक:–** १५/०७/२००९

सुचकाचे नाव :– श्री. अंकूश म्हस्के

अनुमोदकाचे नाव :– श्रीम. रजनी महाडिक

हे वृक्षप्राधिकरण महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक २५/०२/२००९ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**एकमताने**

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:–** विषय क्रमांक. २ वाचुन दाखवितात.

**विषय क्र २ :–** बॅरेक नं. २००५ रुम नं. १५, स्वामी शांतीप्रकाश आश्रम रोड, उल्हासनगर–५ येथिल पिंपळाचे झाड तोडणेस परवानगी देणे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–** यापूर्वी झाडे तोडल्यास ज्या काही परवानग्या दिल्या आहेत. त्याठिकाणी ठरावानुसार नवीन झाडे लावण्यात आली आहेत काय?

**सदस्य श्री. जीवन इदनानी:–** आजच्या या सभेत प्रभाग अधिकारी उपस्थित नाहीत, आपण झाडे तोडण्यास ज्या काही परवानग्या देतो त्यानुसार वृक्ष अधिकारी यांनी कार्यवाही करायची असते. आपण सदस्य गण फक्त चर्चा करुन निघुन जावु, कार्यवाही त्यांना करायची असल्यामुळे त्यांनी सभेत उपस्थित असले पाहिजे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–** आजपर्यंत झाडे तोडण्यास किती परवानग्या देण्यात आलेल्या आहेत त्याचा अहवाल पुढील सभेत सादर केला जावा.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:–** झाडे तोडणे आवश्यक आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल वृक्ष अधिकारी म्हणुन प्रभाग अधिकाऱ्यांनी दिला पाहिजे.

**श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती** :– या बाबतचा तक्ता तयार करुन दिला जाईल पुढील सभेत येताना तो भरुन आणला जावा.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:–** झाडे तोडण्यासाठी देण्यात आलेल्या परवानग्याबाबतचा प्रत्येक सहा महिन्याचा अहवाल महासभेपुढे सादर केला पाहिजे अशी तरतुद आहे.

**सदस्य श्री. जीवन इदनानी:—** तसेच प्रत्येक वर्षाच्या जुलै महिन्यामध्ये पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल महासभेपुढे सादर केला पाहिजे अशी तरतुद असताना ही गेल्या तीन चार वर्षापासुन पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल महासभेत सादर केला जात नाही.

**श्री. आर.बी. शिर्के:—** मागील वर्षी हे काम पुणे येथील यशदा या संस्थेत देण्यात आले होते.

यावेळी श्री. नंदलाल समतानी प्रभाग अधिकारी तथा वृक्ष अधिकारी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती:—** श्री. समतानी आता किती वाजले आहेत आणि आता सभेची वेळ काय होती?

**श्री. नंदलाल समतानी, प्रभाग अधिकारी तथ वृक्ष अधिकारी:—** या सभेबाबतची सूचना आता आता मला प्राप्त झाली आहे.

**महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:—** सभेची सूचना ७ दिवसांपूर्वीच सर्वांना प्रस्तुत करण्यात आली आहे आपल्या प्रभाग समितीस सभा सूचना मिळाली आहे किंवा नाही याबाबत पोच तपासुन शहानिशा केली जाईल आणि यापूर्वीच सभासूचना देवूनही, सभा सूचना आता दिल्याचे जर खोटे सागंत असाल तर आपणावर कारवाई केली जाईल.

**श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती:—** आजच्या सभेत अनुपस्थित असलेल्या प्रभाग अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाईल.

**काही सदस्य :—** पास पास........

**श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती:—** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

---

☑ **विषय क्र २:—** बॅरेक नं. २००५ रुम नं. १५, स्वामी शांतीप्रकाश आश्रम रोड, उल्हासनगर—५ येथिल, पिंपळाचे झाड तोडणेस परवानगी देणे.

## प्रस्तावना

उपरोक्त विषयाबाबत श्रीमती दिपा जगदिश वाधवा यांनी त्यांच्या दिनांक २१/११/२००८ च्या पत्रानुसार बॅरेक नं. २००५ रुम नं. १५, स्वामी शांतीप्रकाश आश्रम रोड, उल्हासनगर—५या ठिकाणी असलेले पिंपळाचे झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१ घरामध्ये जाणेयेण्यास त्रास होत आहे

२ झाडाची मुळे जमिनीवर आलेली आहेत,

३ भिंतीला भेगा पडल्या आहेत,

४ सदर झाडाच्या फांदया चौहुबाजुने पसरलेल्या आहेत.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

<u>वृक्षप्राधिकरण ठराव क्र</u> :– ७२ <u>दिनांकः–</u> १५/०७/२००९

सुचकाचे नाव :– श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती दिपा जगदिश वाधवा यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून बॅरेक नं. २००५ रुम नं. १५, स्वामी शांतीप्रकाश आश्रम रोड, उल्हासनगर–५या ठिकाणी असलेले पिंपळाचे झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीचे एक नविन झाड ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजाः–</u> विषय क्रमांक. ३ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र ३ :–</u> बॅरेक नं. २०८४, रुम नं. ८, सेक्शन–३५, उल्हासनगर–५ येथिल पिंपळाचे झाड तोडणेस परवानगी देणे.

<u>काही सदस्य :–</u>पास पास........

<u>श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापतीः–</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

---

☑ <u>विषय क्र ३ःं–</u> बॅरेक नं. २०८४, रुम नं. ८, सेक्शन–३५, उल्हासनगर–५ येथिल पिंपळाचे झाड तोडणेस परवानगी देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाबाबत श्री. इंदर दयालदास कटारीया यांनी त्यांच्या दिनांक १७/१०/२००८ च्या पत्रानुसार बॅरेक नं. २०८४, रुम. नं.८, सेक्शन–३५, उल्हासनगर–५, या ठिकाणी असलेले पिपंळाचे झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१ पिपंळाचे झाडाची मुळे घराच्या खाली गेली आहेत.

२ दरवाजा जवळील भिंतीला तडा गेला आहेत.

३ झाडाची मुळे जमिनीवर आलेली असल्यामुळे झाड पावसाळयात कधीही पडण्याची शक्यता आहे.

४ सदर झाड झुकले आहे. व सदर झाड मुळापासुन पडण्याची शक्यता आहे. पावसामुळे हे झाड केव्हाही तुटुन पडून हानी होण्याची शक्यता आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

<u>वृक्षप्राधिकरण ठराव क्र :–</u> ७३ <u>दिनांक:–</u> १५/०७/२००९

सुचकाचे नाव :– श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. बी.बी. मोरे

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. इंदर दयालदास कटारीया यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून बॅरेक नं. २०८४, रुम. नं.८, सेक्शन–३५, उल्हासनगर–५, या ठिकाणी असलेले पिपंळाचे झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीचे एक नविन झाड ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:–</u> विषय क्रमांक. ४ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र ४ :–</u> बास्कोनिया ट्रस्ट, डी.जी. क्लब रोड, सेक्शन –१७, उल्हासनगर–३ येथिल **निंबाचे झाड** तोडणेस परवानगी देणे.

यावेळी सदस्य श्री. लाल पंजाबी, सदस्या श्रीम. मोना वनवानी, श्रीम. निलू चांदवानी, श्रीम. रजनी महाडिक यानी सभागृहात प्रवेश केला.

काही सदस्य :—पास पास........

श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती:— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

---

☑ विषय क्र ४ :— बास्कोनिया ट्रस्ट, डी.जी. क्लब रोड, सेक्शन —१७, उल्हासनगर—३ येथिल निंबाचे झाड तोडणेस परवानगी देणे.

## प्रस्तावना

उपरोक्त विषयाबाबत श्री. मकसद खान यांनी त्यांच्या दिनांक २७/०१/२००९ च्या पत्रानुसार बास्कोनिया ट्रस्ट, डी.जी. क्लब रोड, सेक्शन —१७, उल्हासनगर—३, या ठिकाणी असलेले निबांचे झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१ हे झाड धोकादायक असल्याने ते तोडणे आवश्यक आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :— ७४ दिनांक:— १५/०७/२००९

सुचकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. मकसद खान यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका—याच्या अहवालावरून बास्कोनिया ट्रस्ट, डी.जी. क्लब रोड, सेक्शन —१७, उल्हासनगर—३, या ठिकाणी असलेले निबांचे झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीचे एक नविन झाड ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:— विषय क्रमांक. ५ वाचुन दाखवितात.

**विषय क्र ५ :—** गुरुतेग बहाद्र कॉलनी बॅ.नं. ६७३ समोर, उल्हासनगर—३ येथिल पिंपळाचे झाड तोडणेस परवानगी देणे.

**काही सदस्य :—**पास पास........

**श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती:—** सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

☑ **विषय क्र ५:—** गुरुदेव तेगबहाद्र कॉलनी बॅ.नं. ६७३ समोर, उल्हासनगर—३, येथील पिंपळाचे झाड तोडणेस परवानगी देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयाबाबत श्री नरेंद्र पी. रंगवानी यांनी त्यांच्या दिनांक १९/०७/२००८ च्या पत्रानुसार गुरुदेव तेगबहाद्र कॉलनी बॅ.नं. ६७३ समोर, उल्हासनगर—३, या ठिकाणी असलेले पिपंळाचे झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१ पिपंळाचे झाड धोकादायक असल्या कारणाने तोडणे आवश्यक आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

**वृक्षप्राधिकरण ठराव क्र :—** ७५ **दिनांक:—** १५/०७/२००९

सुचकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री नरेंद्र पी. रंगवानी यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका—याच्या अहवालावरून गुरुदेव तेगबहाद्र कॉलनी बॅ.नं. ६७३ समोर, उल्हासनगर—३, या ठिकाणी असलेले पिपंळाचे झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीचे एक नविन झाड ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:—</u> प्रशासनाच्या वतीने आयत्या विषयान्वये २—३ विषय प्राधिकरणापूढे मंजुरीस्तव ठेवण्यात येत आहेत. आपल्यातील बहुसंख्य सदस्यांची समंती असेल तर ते आजच्या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यात येतील.

<u>काही सदस्य :—</u>नाही, नाही सदरचे विषय पूढील सभेच्या कार्यसूचीवर येवू दया.

सांयकाळी ४.५५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे वृक्षप्राधिकरणाचे सभापती मा.आयुक्त श्री. <u>अशोक बागेश्वर</u> यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:
७/११/२००९

## <u>दि. ७/११/२००९ रोजी घेण्यांत आलेल्या वृक्षप्राधिकरण समिती सभेचे इतिवृत्त</u>

५

उल्हासनगर महानगरपालिकेच्य वृक्ष प्राधिकरण समितीची सभा उल्हासनगर महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरणाची सभा, दिनांक ७/११/२००९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील मा. आयुक्तांच्या दालनात आयोजित करण्यात आली सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य उपस्थित होते.

आयुक्त —— श्री. अशोक बागेश्वर

| | |
|---|---|
| ९. श्री. राजू इदनानी | सदस्य |
| १०.श्री. विनोद ठाकुर | —''— |
| ११.श्री. लाल पंजाबी | —''— |
| १२.श्रीमती मोना वनवारी | —''— |
| १३.श्री. राजेश वानखेडे | —''— |
| १४.श्रीमती मिना सोनेजी | —''— |
| १५.श्री.बी.बी. मोरे | —''— |
| १६.श्रीमती सुरेखा वेलकर | —''— |

व खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थितीत होते.

| | |
|---|---|
| १. श्री. अंकुश म्हस्के | सदस्य |
| २. श्री. दिलीप गायकवाड | —'— |
| ३. श्रीमती ज्योती माने | —'— |
| ४. श्री. जमनु पुरस्वानी | —'— |
| ५. श्रीमती रजनी महाडिक | —'— |
| ६. श्री. राजू जग्यासी | —'— |
| ७. श्रीमती निलू चांदवानी | —'— |

खाली दर्शविलेले अधिकारी सभेत उपस्थित होते.

६. श्री. प्रकाश पं. कुकरेजा, महापालिका सचिव
७. श्री. जवांदे,शहर अभियंता तथा मुख्य वृक्ष अधिकारी
८. श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि
९. श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी तथा वृक्ष अधिकारी
१०.श्री. युवराज भदाणे, प्रभारी प्रभाग अधिकारी तथा वृक्ष अधिकारी
११.श्री. नंदु समतानी, प्रभारी प्रभाग अधिकारी तथा वृक्ष अधिकारी

**तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.**

१. श्री. तानाजी पतंगराव, लिपिक

सांयकाळी ४.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:—</u> विषय क्रमांक. १ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र १ :—</u> मागील सभेचे दिनांक १५/७/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

<u>काही सदस्य :—</u>पास पास........

<u>श्री. समीर उन्हाळे, मा. आयुक्त तथा सभापती</u> :— मागील सभेचे दिनांक १५/७/२००९ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे..



---

☑

<u>विषय क्र १:—</u> मागील सभेचे दिनांक १५/७/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे

<u>वृक्षप्राधिकरण ठराव क्र :— ७५ अ</u> <u>दिनांक:— ७/११/२००९</u>

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

हे वृक्षप्राधिकरण महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक १५/७/२००९ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ८ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>एकमताने</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:—</u> विषय क्रमांक २ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र २ :—</u> *नेताजी पुतळा चौक, नारंग क्वासेसच्या बाजुला, उल्हासनगर-5 येथिल **जंगली झाड तोडणेस** परवानगी देणे.*

काही सदस्य :–पास पास........

श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

---

☑

विषय क्र २ :– *नेताजी पुतळा चौक, नारंग क्वासेसच्या बाजुला, उल्हासनगर-5 येथिल **जंगली झाड तोडणेस** परवानगी देणे.*

प्रस्तावना

उपरोक्त विषयाबाबत श्री भारत रामचंद्र राजवानी, नगरसेवक यांनी त्यांच्या दिनांक २६/०७/२००८ व ०२/१२/२००८ च्या पत्रानुसार नेताजी पुतळा चौक, नारंग क्लासेसच्या बाजुला उल्हयासनगर –५ या ठिकाणी असलेले जंगली झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे.

उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे..

सदर झाडाच्या फांदया रस्त्यावर झुकल्या आहेत.येणा–या जाणा–या वाहनांवर झाडाच्या फांदया पडून जिवित व वित्तीय हानी होण्याची शक्यता आहे. झाडाची मुळे जमीनीवर आली असून झाड रस्त्यावर झुकले आहे. सदरचे झाड एका बाजूने झुकले आहे व हे झाड मुळापासून पडण्याची शक्यता आहे.पावसामुळे हे झाड केव्हाही तुटून हानी होण्याची शक्यता आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :– ७६ दिनांक:– ७/११/२००९

सुचकाचे नाव :– श्रीमती मिना सोंडे

अनुमोदकाचे नाव :– श्री.बी.बी. मोरे

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री भारत रामचंद्र राजवानी, नगरसेवक यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून नेताजी पुतळा चौक, नारंग क्लासेसच्या बाजुला उल्हासनगर –५ या ठिकाणी असलेले जंगली झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीचे एक नविन झाड ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:— विषय क्रमांक. ३ वाचुन दाखवितात.

विषय क्र ३ :— *प्रितम अपार्टमेंट, भाटिया चौक, साईबाबा मंदिर जवळ, उल्हासनगर-5 येथिल* ***जंगली झाडाच्या फांदया*** *तोडणेस परवानगी देणे*

सदस्य श्री. राजेश वानखेडे :—फांदया तोडण्यासाठी जे प्रस्ताव येतात ते सर्व प्रस्ताव जंगली झाडांचेच आहेत काय? माझ्याकडे या झाडांचे फोटो आहेत. जंगली झाडांच्या नावाखाली दुसरी झाडे तोडली जातात.

श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती:—असे असेल तर पोलिसात तक्रार दाखल करावी लागेल.

सदस्य श्री. राजेश वानखेडे:—पोलिसात तक्रार दाखल करुन काय होणार?

श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती :—अशा प्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी दुसरा काही पर्याय नाही.

काही सदस्य :—पास पास........

श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

---

☑

विषय क्र ३ :— *प्रितम अपार्टमेंट, भाटिया चौक, साईबाबा मंदिर जवळ, उल्हासनगर-5 येथिल* ***जंगली झाडाच्या फांदया*** *तोडणेस परवानगी देणे*

## प्रस्तावना

उपरोक्त विषयाबाबत श्री भारत रामचंद्र राजवानी, नगरसेवक यांनी त्यांच्या दिनांक २६/०७/२००८ व २/१२/२००८ च्या पत्रानुसार प्रितम अपार्टमेन्ट समोर, भाटीया चौक, साई बाबा मंदिराजवळ उल्हासनगर—५ या ठिकाणी असलेले जंगली झाडाच्या फांदया तोडण्यास परवानगी मागितलेली आहे.

उक्त झाडाच्या फांदया खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

जंगली झाडाच्या फांदया रस्त्यावर इतरत्र पसरल्या आहेत सदर झाडाच्या फांदया रस्त्यालगत झुकल्या आहेत येणारे जाणारे वाहनांवर व रहिवाश्यांवर फांदया पडण्याची शक्यता आहे

सदरचे झाड एका बाजूने झुकले आहे व हे झाड मुळापासून पडण्याची शक्यता आहे. पावसामुळे हे झाड केव्हाही तुटून हानी होण्याची शक्यता आहे.

सदर झाडाच्या फांदया तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाडाच्या फांदया तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :—७७ दिनांक:— ७/११/२००९

सुचकाचे नाव :— श्रीमती सुरेखा वेलकर

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वानखेडे

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री भारत रामचंद्र राजवानी, नगरसेवक यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून प्रितम अपार्टमेन्टच्या समोर, भाटीया चौक, साई बाबा मंदिराजवळ उल्हासनगर–५, या ठिकाणी असलेल्या जंगली झाडाच्या फांदया तोडणेस परवानगी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:–</u> विषय क्रमांक. ४ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र ४ :–</u> *बॅरेक नं. 758, रुम नं. 16, उल्हासनगर-1 येथिल* ***उंबराचे झाड*** *तोडणेस परवानगी देणे.*

<u>काही सदस्य :–</u>पास पास........

<u>श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती</u> :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

---

☑

<u>विषय क्र ४:–</u> *बॅरेक नं. 758, रुम नं. 16, उल्हासनगर-1 येथिल* ***उंबराचे झाड*** *तोडणेस परवानगी देणे.*

<u>**प्रस्तावना**</u>

उपरोक्त विषयाबाबत श्री सुनिल जे. चांदवानी यांनी त्यांच्या दिनांक ६/६/२००८ च्या पत्रानुसार बॅ. क्र. ७५८ रूम नं. १६ उल्हासनगर –१ या ठिकाणी असलेले उंबराचे झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

सदरचे झाड धोकादायक असल्या कारणाने तोडणे आवश्यक आहे.

सदरचे झाड झुकले आहे व हे झाड मुळापासून पडण्याची शक्यता आहे.पावसामुळे हे झाड केव्हाही तुटून हानी होण्याची शक्यता आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

<u>वृक्षप्राधिकरण ठराव क्र</u> :– ७८ <u>दिनांक:–</u> ७/११/२००९

सुचकाचे नाव :— श्रीमती मिना सोंडे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वानखेडे

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री सुनिल जे. चांदवानी यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका—याच्या अहवालावरून बॅ. क्र. ७५८ रूम नं. १६ उल्हासनगर —१, या ठिकाणी असलेले उंबराचे झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीचे एक नविन झाड ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:—</u> विषय क्रमांक. ५ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र ५ :—</u> *सेंट्रल पोलिस स्टेशन समोर, उल्हासनगर-3 येथिल* ***आंब्याच्या झाडाच्या फांदया*** *तोडणेस परवानगी देणे*

<u>श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती</u> :— सर्व वृक्ष अधिका—यांना विचारु इच्छितो, फांदयाच तोडतात की झाडे तोडतात?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u>फांदया तोडतो म्हणुन सांगातात व प्रत्यक्षात झाडे तोडतात. श्री. समिर उन्हाळे आयुक्त असतांना वृक्ष प्राधिकरणाच्या एका सभेत आजपर्यंत किती झाडे तोडण्यास परवानगी देण्यात आलेली आहे? आणि प्रत्यक्षात किती झाडे तोडण्यात आलीत? तोडण्यात आलेल्या झाडांच्या जागी नविन झाडे लावण्यात आली आहेत किंवा नाहीत? याबाबतचा अहवाल सादर करण्याकामी वृक्ष प्राधिकरणााकडुन निर्देश देण्यात आले होते तो अहवाल आला आहे का?

<u>श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती</u> :—वृक्ष अधिकारी श्री. समतानी, फांदया तोडण्यास परवानगी देण्यात आल्यानंतर त्याठिकाणी फांदयाच तुटल्या पाहिजेत. झाड तुटता कामा नये. झाड तुटल्यास गुन्हा दाखल करा.

<u>काही सदस्य :—</u>पास पास........

<u>श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती</u> :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

---

☑

<u>विषय क्र ५ :—</u> *सेंट्रल पोलिस स्टेशन समोर, उल्हासनगर-3 येथिल* ***आंब्याच्या झाडाच्या फांदया*** *तोडणेस परवानगी देणे*

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाबाबत श्रीमती प्रमिला सॅल्बेडोर यांनी त्यांच्या दिनांक २२/१/२००९ च्या पत्रानुसार सेंट्रल पोलिस समोर, उल्हासनगर–३ या ठिकाणी असलेल्या आंब्याच्या झाडाच्या फांदया तोडणेस परवानगी मागितलेली आहे. उक्त झाडाच्या फांदया खालील कारणामुळे छाटणे आवश्यक आहेत.

३. आंब्याच्या झाडाच्या फांदया तोडणे आवश्यक आहे.

सदर झाडाच्या फांदया तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाडाच्या फांदया छाटणे करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :– ७९ दिनांक:– ७/११/२००९

सुचकाचे नाव :– श्री.जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. बी.बी. मोरे

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती प्रमिला सॅल्बेडोर यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून सेंट्रल पोलिस स्टेशन समोर, उल्हासनसगर–३ या ठिकाणी असलेल्या आंब्याच्या झाडाच्या फांदया तोडण्यास परवानगी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:– विषय क्रमांक. ६ वाचुन दाखवितात.

विषय क्र ६ :– बॅ.नं. 1507/12, बी.सेक्शन 30, उल्हासनगर-4,येथिल
वडाचे झाड तोडणेस परवानगी देणे

काही सदस्य :–पास पास........

श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

---

☑

विषय क्र ६ :– बॅ.नं. 1507/12बी, सेक्शन 30, उल्हासनगर-4,येथिल
वडाचे झाड तोडणेस परवानगी देणे

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयाबाबत श्री. किशोर द. शेटे यांनी त्यांच्या दिनांक २६/११/२००७ च्या पत्रानुसार बॅ.नं. १५०७/१२, बी. सेक्शन ३०, उल्हासनगर–४ या ठिकाणी असलेल्या वडाचे झाड तोडणेस परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे छाटणे आवश्यक आहेत.

१. सदर झाड झुकलेल्या अवस्थेत आहे. व त्यास अस्तित्वात असलेल्या ओटयाला तडे गेलेले आहे. झाडाच्या फांदया शेजारील घरांवर गेलेल्या असल्याने कधीही कौले तुटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडणे करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

<u>वृक्षप्राधिकरण ठराव क्र</u> :– ८० <u>दिनांक:– ७/११/२००९</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती सुरेखा वेलकर

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वानखेडे

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री किशोर द. शेटे यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून बॅ. क्र. १५०७/१२,बी. सेक्शन ३०, उल्हासनगर–४ या ठिकाणी असलेले वडाचे झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीचे एक नविन झाड ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>आजपर्यंत किती झाडे तोडण्यास परवानगी देण्यात आली? त्यानुसार किती झाडे तोडण्यात आली याचा आम्ही अहवाल मागितला आहे तो आजपर्यंत मिळाला नाही. झाडे तोडण्यास परवानगी देवुन शहर उजाड करायचे आहे काय?

<u>श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती</u> :–वृक्ष प्राधिकरणाच्या एका सभेत याबाबत निर्देश देण्यात आलेले होते. परंतु त्यानंतर विधानसभा निवडणूका लागल्याने अधिकारी, कर्मचारी या निवडणूक कामात व्यस्त होते. परंतु आता पुढील सभेत मागील सहा महिन्याचा अहवाल सादर करण्याबाबतीत मी वृक्ष अधिका–यांना येथे निर्देश देत आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :–</u> इमारत बांधकाम परवानगीसाठी ज्याचे अर्ज असतात अशा लोकांचेच झाडे तोडण्याचे अर्ज असतात. याचाच अर्थ इमारत बांधतांना अडचणीची ठरणारी झाडे तोडली जात आहेत. प्रभाग समितीमध्ये आपले जे अधिकारी आहेत ते या बाबीकडे लक्ष का देत नाहीत?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>आजपर्यंत किती झाडे तोडण्यात आलेत याचा अहवाल पुढील सभेत आला पाहिजे.

**<u>श्री. अशोक बागेश्वर, मा. आयुक्त तथा सभापती</u>** :—सर्व वृक्ष अधिका—यांना निर्देश देतो की, झाडे तोडण्यास देण्यात आलेल्या परवानगी नुसारच झाडे तोडली जातात की नाही हे तपासून पाहण्याबाबतीत मुकादमांना आदेश दया. तसेच परवानगी न घेता झाडे तोडली जातात का तेही तपासून पहा.

**<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>**शहरामध्ये एकुण किती झाडे आहेत याची माहिती व्हावी म्हणुन वृक्ष गणना झाली पाहिजे.

**<u>सदस्य श्री.जीवन इदनानी :—</u>**महापालिकेच्या वतीने शहरात एखादे गुलाब पुष्प प्रदर्शन आयोजित केले जावे.

**<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि:—</u>**याबाबत मागील वेळेस काही नर्सरी वाल्याशी संपर्क साधला होता तेव्हा काही नर्सरीवाल्यांनी आणि गुलाबपुष्प प्रदर्शनात सहभागी होण्याची सहमती दर्शविली होती. परंतु ऐनवेळी ते प्रदर्शनात सहभागी झाले नाहीत.

सांयकाळी ४.२५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे वृक्षप्राधिकरणाचे सभापती मा.आयुक्त श्री. अशोक बागेश्वर यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका